

# समान नागरी कायदा

## (एक टीकात्मक भाष्य व समीक्षा)

---


# Common Civil Code (Marathi)

## A Critical Study


---

मौलाना वहीदुद्दीन खान


Books on Peace and Spirituality by
**Maulana Wahiduddin Khan**




The purpose of this book is to re-engineer the mind of those who think in terms of voilence. The book has a twofold target : first to help those how are engaged in voilence realize that the present age is an age of peace. Second, the author expounds on the guiding principles that should govern the actions of those who want to establish peace in society.
Pages : 192




Islam has become synonymous with global political jihad today and islamic spirituality is often mistaken for orthodoxy. Then how do young Muslims hold on to their faith? How do they open the door for others to appreciate the true beauty of their religion ?
Pages : 222




Lucidly written and expensive in scope, this work clears up the misunderstandings that abound on the subject of islamic teachings about peace and war. It clearly states the authentic position on these mattes, which is that islam is a completely peaceful religion.
Pages : 352

# समान नागरी कायदा

(एक टीकात्मक भाष्य व समीक्षा)

---

## Common Civil Code (Marathi)

## A Critical Study

---

मौलाना वहीदुद्दीन खान

# समान नागरी कायदा

समान नागरी कायदा या विषयावर स्वातंत्र्यापूर्वीपासून हिंदुस्तानांत चर्चा केली जात आहे. मात्र आता स्वातंत्र्यानंतर बनवण्यात आलेल्या घटनेच्या ४४ व्या कलमाअंतर्गत त्यावर विचारविनियम करण्यात येत आहे.

# घटनेचे स्वरुप

राष्ट्राचे शासन कोणत्या पद्धतीने चालवण्यात यावे यासाठी घटनेमध्ये मूलभूत तत्वप्रणाली (Fundamental principles by which a country should be governed) अंतर्भूत असते. घटना हे शासन चालवण्याचे साधन आहे. कायद्याचा हा अंत्यंत मौलिक दस्तऐवज आहे आणि म्हणून ती संक्षिप्त असावी. कारण घटना मोठी असल्यास मतभेद वाढत जातात आणि पुन:पुन्हा त्यात दुरुस्ती करावी लागते. त्यामुळे घटनेचे महत्व कमी होते. काही तज्ज्ञांनाच त्याचे आकलन होते. सर्वसामान्य नागरीकांसाठी त्यात काही स्वारस्य राहात नाही आणि म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे घटनातज्ज्ञ प्राध्यापक डेव्हिड फेलमन (युनिव्हर्सिटी ऑफ विसकॉंसन) त्याचप्रमाणे नानी पालखीवाला यासारख्या भारतीय घटनेच्या विद्वान लोकांनी घटना संक्षिप्त असावी असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

आधुनिक जगातील अनेक विकसित देशांच्या घटनांचे स्वरुप खूप संक्षिप्त आहे. सर्वाधिक विकसित अमेरिकेची घटना केवळ ७००० शब्दांची आहे. जपानसारख्या विकसित देशाची घटनादेखील संक्षिप्त आहे. परंतु जॉर्जियासारख्या अविकसित देशाची सुधारित घटना ५००,००० शब्दांची आहे. (एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका ५/८५-८६).

भारतीय घटना कदाचित सर्वाधिक मोठी असावी. १२ सविस्तर परिशिष्टांव्यतिरिक्त त्यामध्ये अनेक उपकलमांसहित ९५ कलमांचा समावेश आहे. अशा प्रकारे भारतीय घटनेचे मोठे स्वरुप असल्यामुळे नोव्हेंबर १९४९

पासून आजतागायत त्यामध्ये ८० दुरुस्त्या करण्यात आल्या असून अनेक दुरुस्त्या प्रलंबित आहेत. भारतीय घटना सविस्तर असली तरी राष्ट्राला विकासाकडे नेण्यामध्ये ती अपयशी ठरली आहे. (१९४६-४९) घटनेचा मसुदा तयार करण्यात आला. या कालावधीत डॉ. राजेंद्रप्रसाद घटना समितीचे अध्यक्ष होते. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी त्यांनी घटनेच्या मसुद्यावर सही केली असली तरी ते घटनेच्या इतक्या मोठ्या दस्तऐवजाविरुद्ध होते.

In his valedictory address to the constituent Assembly Dr. Rajendra Prasad said that everything cannot be written in the Constitution and hoped for the development of healthy conventions. But these have not been developed and everything has to be written in the Constitution.

(The Hindustan Times May 24, 1995)

संसदेत आपले निरोपाचे भाषण देताना डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले होते, "प्रत्येक बाबीचा घटनेमध्ये समावेश असणे आवश्यक नाही." प्रभावी लोकसंमत पद्धती अस्तित्वात येतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. मात्र असे घडले नाही. याउलट प्रत्येक बाबीचा घटनेमध्ये समावेश करण्यात यावा अशी एक प्रथाच पडली.

अनावश्यक कलमांचा समावेश केल्यामुळे घटनेचा आकार वाढतो. भारतीय घटनेमध्ये अशा प्रकारच्या अनावश्यक कलमांचा भरणा आहे. त्यामध्ये राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वातील समान नागरी कायदा यासंबंधी कलम ४४ चा समावेश आहे. संपूर्ण भारतातील सर्व नागरीकांना समान नागरी कायदा लागू करण्यासाठी राज्यशासनाकडून प्रयत्न करण्यात येतील असे यामध्ये नमूद करण्यात आले आहे.

The State shall endeavour for the citizens a uniform civil code throughout the territory of India.

देशातील सर्व नागरीकांनी एकाच प्रकारचा आहार करावा अथवा गणवेष घालावा अशा प्रकारचे हे कलम आहे. देशभरातील सर्व नागरीकांसाठी हे अशक्य आहे-पुरूष, स्त्रीया आणि मुले-या सर्वांसाठी!

त्याचप्रकारे या संदर्भात कायदा प्रचलित नसला तरी भारतासारख्या मोठ्या देशातील सर्व लोकांनी एकाच पद्धतीने लग्न समारंभ करावेत हे अशक्य आहे. घटनेचे काम शासनाच्या धोरणासंबंधी मूलभूत तत्त्वप्रणाली स्पष्ट करण्याचे आहे. वैयक्तिक जीवनात व्यक्तीच्या आवडीनिवडी यामध्ये ढवळाढवळ करुन समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे हे घटनेचे कार्यक्षेत्र नाही.

परंतु ज्यावेळी आम्ही एखादी बाब लिहून ती प्रकाशित करतो त्यावेळी अनेक लोक त्याला सत्य समजतात. हीच गोष्ट घटनेतील या कलमांसंबंधी आहे आणि म्हणून संसदेत समान नागरी कायदा संमत करुन त्याची देशभर अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## नेहरु रिपोर्ट

देशव्यापी समान नागरी कायदा बनवण्याच्या संदर्भात विचारधारेस इतिहास आहे. इ.स. १९२८ मध्ये नेहरु रिपोर्टमध्ये याचा प्रथम उल्लेख करण्यात आला. वास्तविक हा रिपोर्ट म्हणजे ख्यातनाम कायदेतज्ज्ञ पंडित मोतीलाल नेहरु यांनी तयार केलेला स्वतंत्र्य भारताच्या घटनेचा पूर्व नियोजित एक मसुदाच होता. घटनेच्या या मसुद्यात असे सूचित करण्यात आले होते की स्वतंत्र भारतात विवाहाच्या संदर्भात सर्व बाबी समान राष्ट्रीय कायद्या अंतर्गत समाविष्ट करण्यात याव्यात. त्या काळातील उलमांनी यास तीव्र विरोध केला होता. त्यावेळच्या ब्रिटिश शासनानेदेखील यास मान्यता देण्यास नकार दिला. कारण हिंदुस्थानला स्वसत्ताक राज्याचा दर्जा देण्याची त्यांची योजना होती.

त्यानंतर डिसेंबर १९३९ मध्ये यावर निर्णय करण्यासाठी काँग्रेसचे एक अधिवेशन लाहोर येथे आयोजित करण्यात आले. या अधिवेशनात नेहरु रिपोर्टवर विचारविनिमय करण्यात आला आणि तो रद्दबातल ठरवण्यात आला.

## सुप्रिम कोर्टाचा निर्णय

१९६५ पासून सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधीशांनी याबाबतीत आपले मत

व्यक्त करण्यास सुरुवात केली. त्यानंतर समान नागरी कायद्याच्या प्रश्नास नवीन कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले आहे.

यासंदर्भात न्यायालयीन चर्चेची सुरुवात सुप्रिम कोर्ट ऑफ इंडियाचे माजी सरन्यायाधीश श्री. वाय. व्ही. चंद्रचूड यानी दिलेल्या निकालापासून होते. १९८५ मध्ये त्यानी मोहम्मद अहमद शाह बानो केस बाबतीत आपला निकाल दिला. या निकालात त्यानी असेही मत नोंदवले, की "घटनेच्या कलम ४४ नुसार कायदा बनवणे काळाची गरज आहे. समान नागरी कायदा राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेसाठी सहाय्यभूत होईल."

A common civil code will help the cause of national integration.

त्यानंतर १९८५ मध्ये सुप्रिम कोर्टाचे न्यायाधीश चिनप्पा रेड्डी यांनी एका केस संदर्भात आपले मत व्यक्त करताना सांगितले की, " हे एक दुसरे उदाहरण आहे ज्यावरुन समान नागरी कायद्याची त्वरित अंमलबजावणी आवश्यक आहे हे लक्षात येते."

The present case is yet another which focuses ....... on the immediate and compulsive need for a uniform civil code.

हीच गोष्ट अधिक सविस्तर आणि कडक शब्दात सुप्रिम कोर्टाच्या दोन न्यायाधीशांच्या पीठाने मे १९९५ मध्ये आपल्या निर्णयात नमूद केली आहे. याचे सदस्य न्यायमूर्ती कुलदीपसिंग आणि न्यायमूर्ती आर. एस. सहाय होते.

To introduce a uniform personal law is a decisive step towards national consolidation ... There is no justification whatsoever in delaying indefinitely the introduction of a uniform personal law in the country (P. 22).

## घटनेचे कलम ४४

हे सर्व घटनेच्या कलम ४४ च्या संदर्भात नमूद करण्यात आले आहे. हे कलम हिंदुस्थानच्या घटनेतील चौथ्या भागात आहे. राज्याची धोरणात्मक मार्गदर्शक तत्वप्रणाली (directive principles) म्हणून घटनेत हा भाग

समाविष्ट करण्यात आला आहे. याच्या पोट कलम ३७ मध्ये स्पष्ट म्हटले आहे, की या भागात ज्या उपकलमांचा समावेश करण्यात आला आहे त्या कोणत्याही न्यायालयास लागू करता येणार नाहीत. याचा संबंध शासन आणि राज्यांशी आहे. या परिस्थीतीत सुप्रिम कोर्टातील न्यायाधीशांनी पुन:पुन्हा कलम ४४ चा समान नागरी कायद्याच्या संदर्भात उल्लेख करणे अयोग्य वाटते आणि म्हणून जनतादलाच्या निर्णयाचा परामर्श घेतांना (दि पायोनियर, १५ मे, १९९५) च्या अंकात म्हटले आहे. की हे संसदेच्या कार्यक्षेत्रांत अतिक्रमण करण्यासारखे आहे.

It is a judicial trespass on Parliament's Jurisdiction.

याच संदर्भात "दि हिंदुस्तान टाईम्स" १२ मे, १९८५ ने आपल्या अग्रलेखाची सुरूवात या वाक्याने केली होती. हिंदुस्तानच्या सुप्रिम कोर्टाने गेल्या काही वर्षात पुन:पुन्हा अशा प्रदेशात प्रवेश करण्यास सुरुवात केली आहे, जिथे देवदूतदेखील प्रवेश करण्यास घाबरतात.

India's Supreme Court in recent years has displayed a penchant for rushing into terrain that angels fear to tread.

घटनेनुसारदेखील समान नागरिक कायदा करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे. अर्थात १९५६ मध्ये त्यावेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्पष्टपणे सांगितले होते. " मला वाटत नाही ती वेळ आली आहे. की यास मी पूर्णत्वास पोहोचऊ शकतो."

I do not think at the present moment the time is ripe in India for me to try push it through.

त्यानंतर इंदिरा गांधीनीदेखील हेच सांगितले आणि पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनीही त्याचाच पुनरूच्चार केला. (टाईम्स ऑफ इंडीया, नवी दिल्ली २८ जुलै, १९९५, पान क्रं. ७) ही अजब गोष्ट आहे. की ज्या लोकांवर समान नागरी कायदा अमलांत आणण्याची जबाबदारी आहे तेच त्यापासून दूर जात आहेत आणि ज्या लोकांचा याच्याशी सुरुवातीपासून संबंध नाही ते त्या बाबतीत भाषणबाजी करत आहेत.

# धार्मिक स्वातंत्र्य आवश्यक

जे लोक घटनेच्या ४४ व्या कलमाचा संदर्भ देऊन समान नागरी कायद्याचे समर्थन करतात त्यांनी कदाचित यावर खूपच कमी विचार केला आहे. घटनेतील कलम २५ याच्याविरुद्ध आहे. भारतीय घटनेच्या कलम २५ नुसार भारताच्या प्रत्येक नागरिकास सद्सद्विवेक बुद्धी आणि धार्मिक विधी त्याचप्रमाणे धर्मप्रसार यांचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

All persons are equally entitled to freedom of conscience and the right freely to profess, practise and propagate religion.

मुक्तपणे आपल्या धर्माचा स्वीकार करण्याचा त्यांना अधिकार आहे. धर्म स्वीकारणे एखाद्या व्यक्तीच्या अथवा समूहाच्या स्वत:च्या मर्जीवर अवलंबून आहे. यासाठी कलम २५ च्या स्पष्टीकरणात म्हटले आहे, की "शीख लोकांच्या धर्म स्वातंत्र्यात त्यांचा हक्कदेखील समाविष्ट आहे, ते आपल्या श्रध्दे / निष्ठेनुसार आपल्याबरोबर कृपाण (तलवार) ठेऊ शकतात." घटनेत सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्कांच्या बाबतीत असे म्हटले आहे, की भारतीय नागरीकांचा कोणताही समूह ज्याची स्वत:ची भिन्न भाषा, लिपी अथवा संस्कृती आहे. त्यास आपले हक्क सुरक्षित ठेवण्याचा अधिकार आहे. (पोट कलम २९)

याशिवाय कलम २५ ज्यामध्ये धार्मिक स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे ते नागरीकांच्या मूलभूत हक्कांसंबंधीच्या (Fundamental Rights) घटनेच्या याच भागात समाविष्ट आहे. कलम ४४ हे मार्गदर्शक तत्त्वप्रणालीत (directive principles) सामविष्ट करण्यात आले आहे. पोट कलम ३७ नुसार मार्गदर्शक तत्वप्रणालीतील उपकलमांवर मूलभूत हक्क आधारित आहेत.

अशा परिस्थितीत सरकारने समान नागरी कायदा संमत करावा अशी मागणी करणे हे घटनेच्या मूळ आशय (spirit) याच्या विरुद्ध आहे. अशा प्रकारचा कायदा म्हणजे आपल्या धर्मात असमर्थनीय ढवळाढवळ आहे असे

समजणारा एक धर्म समूह जोपर्यंत या देशात आहे तोपर्यंत घटनेतील तरतूदी नुसार समान नागरी कायदा संमत करता येत नाही. जर एखाद्या संसदेने अशा प्रकारचा कायदा संमत केला आणि देशातील कोणत्याही एका समूहाने त्याविरूद्ध  सुप्रिम कोर्टात ते रद्दबातल करावे म्हणून दाद मागितली तर घटनेचे सरंक्षक म्हणून सुप्रिम कोर्टास अशा प्रकारचा कायदा रद्दबातल करावा लागेल.

धर्मासंबंधीचे घटनेतील कलम ही साधी बाब नाही. १९४८ मध्ये भारत सदस्य असलेल्या संयुक्त राष्ट्र संघाने प्रसिद्ध केलेला जागतिक मानव हक्काधिकार जाहीरनामा (Declaration of Human Rights) याच्याशी ते निगडित आहे. या जाहीरनाम्यातील १४ व्या कलमात नमूद करण्यात आले आहे. की प्रत्येक व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र्य आहे. धर्म बदलण्याचा आणि त्याच्या पसंतीच्या धर्मावर श्रद्धा बाळगण्याचा त्याला हक्क आहे. भारतातर्फे या जाहिरनाम्यावर एक राष्ट्र म्हणून स्वाक्षरी करण्यात आली आहे आणि संमती शिक्कामोर्तब करण्यात आली आहे. आणि म्हणून धार्मिक स्वातंत्र्य प्रत्येक भारतियाचा असा हक्क आहे जो हक्क कोणत्याही परिस्थितीत रद्दबातल [illegible]

## धर्म आणि व्यक्तिगत कायदा

सुप्रिम कोर्टाच्या दोन सदस्य खंडपीठाने (मे, १९९५) मध्ये आपल्या ३१ पानी निकालपत्रात या कायद्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. या निकालपत्रात नमूद करण्यात आले आहे की सुसंस्कृत समाजात धर्म आणि व्यक्तिगत कायदा यामध्ये सुसंगती (connection) असणे आवश्यक नाही. यावर कलम ४४ आधारित आहे. कलम २५ द्वारे धार्मिक स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे तर कलम ४४ याद्वारे धर्मास सामाजिक बांधिलकी आणि व्यक्तिगत कायद्यापासून विभक्त करण्यात आले आहे.

Article 44 is based on the concept that there is no necessary connection between religion and personal law in a civilised society. Article 25 guarantees religious freedom

whereas Article 44 seeks to divest religion from social relations and personal law.

हे पूर्णता: निराधार आहे. सर्व धर्मांच्या विद्वानांच्या मतानुसार धर्माचा संबंध तीन बाबींशी निगडित आहे. १) श्रद्धा, २) भक्ती, आणि ३) नैतिक मूल्ये यामध्ये नैतिक मूल्ये, यामध्ये स्त्री पुरूषांच्या लैंगिक संबंधाचा समावेश होतो, नि:संशय या क्रमवारीत ते उच्च स्तरावर आहे. विवाह ही नैतिक बाब आहे. आणि म्हणून ती धर्माचा अविभक्त भाग आहे.

धर्म आणि व्यक्तिगत कायदा यांच्यातील संबंध इतके स्पष्ट आहेत की न्यायालयाच्या डिव्हीजन बेंचला त्याची दखल घ्यावी लागली. न्यायाधीश आर.एन. सहाय आपल्या स्वतंत्र न्याय पत्रिकेत म्हणतात :

विवाह, वारसाहक्क, घटस्फोट, धर्मांतर या गोष्टी स्वाभाविकच धार्मिक आहेत. सात वेळा अग्नीभोवती प्रदाक्षिणा घालणे अथवा काझीसमोर संमती देणे या बाबी भक्तीप्रमाणेच श्रद्धा आणि सद्सद्विवेक बुद्धीस धरुन आहेत.

धर्मापासून विवाह विभक्त करणे यासाठी कोणताही युक्तिवाद भक्कम नाही. विवाह आणि घटस्फोट या धार्मिक बाबी आहेत. आणि म्हणून घटनेच्या कलम २५ अन्वये संसद अथवा दुसऱ्या कोणत्याही संस्थेला एखाद्या समूहाच्या मर्जीविरुद्ध त्याचा हक्क हिसकाऊन घेण्याचा अधिकार नाही. या

## समान नागरी कायदा आणि राष्ट्रीय एकात्मता

समान नागरी कायदा करण्यामागे काय हेतू आहे? केवळ समान आचार संहितेसाठी समान आचारसंहिता लादण्यात यावी असे कोणताही समजूतदार माणूस म्हणणार नाही. मग त्यामागे खरा उद्देश काय आहे? त्यामुळे एकत्रितपणाची भावना निर्माण होईल आणि राष्ट्रवाद अस्तीत्वात येईल असा त्याच्या समर्थकांचा दावा आहे. म्हणजेच समान नागरी कायदा यामुळे विविध जमातीत अथवा समूहात समान भावनेची निर्मिती होईल आणि गेल्या पन्नास वर्षांपासून ज्याची आम्ही प्रतीक्षा करीत आहोत ते शक्तीशाली राष्ट्र उदयास येईल.

समान कायदा आणि समाज भावना या दोन्ही शब्दप्रयोगामध्ये समाज हा शब्द आहे. त्यामुळे हे दोन्ही शब्दप्रयोग एकदुसऱ्यांशी संलग्न आहेत असा ग्रह आहे. परंतु वस्तुस्थिती ही विचारधारा फेटाळून लावते. आणि म्हणून समान नागरी कायदा आणि समान नागरी भावना यामध्ये कोणताही

## न्यायाधीश कुलदीप सिंग यांचा निवाडा

हिंदू मॅरेज ॲक्ट (हिंदू विवाहसंबंधी कायदा), १९५५ मध्ये हिंदू सक्शेशन ॲक्ट (हिंदू वारसाहक्का संबंधी कायदा), १९५६ मध्ये हिंदू मायनॉरीटीज ॲण्ड गार्डियनशिप ॲक्ट (हिंदू अल्पसंख्यांक आणि पालकत्वाचा कायदा) त्याचप्रमाणे १९५६ मध्ये हिंदू ॲडॉप्शन ॲण्ड मेंटेनन्स ॲक्ट (हिंदू दत्तक आणि निर्वाह कायदा) संमत करण्यात आला. ग्रंथावर आधारित धार्मिक आणि विविध विचारप्रणालीनुसार चालत आलेल्या भिन्न पारंपारिक हिंदू कायद्यांच्या जागी उपरनिर्दिष्ट कायदे संमंत करण्यात आले. देशातील ८० टक्के नागरिक या कायद्याच्या कक्षेत आहेत. (पान क्रं. २). ते पुढे म्हणतात :

घटनाकारांनी घटनेत तरतूद केलेल्या कलम ४४ याची सरकारकडून केव्हा अंमलबजावणी करण्यात येणार याबद्दल आश्चर्य वाटते. पारंपारिक हिंदू कायदा-हिंदूंचा व्यक्तीगत कायदा प्रचलित वारसाहक्क आणि विवाह यासंबंधी सर्व कायद्याची १९५५-५६ मध्ये संहिता (Codification) बनवण्यात आली आणि त्यास अनुमती देण्यात आली. देशांतर्गत समान नागरी कायद्या संदर्भात विलंब करणे हे समर्थनीय नाही. मुस्लिम आणि ख्रिश्चन यांच्या प्रमाणेच हिंदूंचा व्यक्तिगत कायदा विवाह, वारसाहक्क इ. यास धार्मिक आधिष्ठान आहे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी हिंदूंनी त्याचप्रमाणे शीख, बुध्द आणि जैन यांनी आपल्या भावनांचा त्याग केला. मात्र घटनेने समान नागरी कायदा अमलात आणण्यासंबंधी स्पष्ट केले असले तरी इतर धर्मीयांची तसे करण्याची इच्छा नाही. (पान क्रं. २१-२२)

न्यायाधीश कुलदीप सिंग यांच्या निकालाप्रमाणे या देशातील मोठी

लोकसंख्या (८०% हून अधिक) कौटुंबिक समान नागरी कायद्याखाली आणण्यात आली आहे. आता ज्यामध्ये आचार संहितेचे व्यापक स्वरुप आहे असा कायदा करण्यात यावा असे समर्थन करण्यात येत आहे. बहुसंख्य जनतेने हा अपेक्षित कायदा मान्य केला आहे. अशा परिस्थिती समान नागरी कायद्यामुळे सकारात्मक परिणाम प्राप्त झाले आहेत का? याची शहनिशा करणे आवश्यक आहे. आपण पाहतो आहोत, की आपल्या सभोवताली सर्व स्तरावर राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव आहे. राष्ट्रीयत्व अस्तित्वात नाही. विधिमंडळ आणि संसदेच्या अधिवेशनातील गदारोळ यामुळे कोणतेही कामकाज करणे अशक्य होते. पूर्वीपेक्षा आता ग्रामपंचायतीमध्ये वाद वाढले आहेत. या वादांची संख्या न्यायालयात वाढत चालली आहे. एकाच जातीच्या विविध जमातीमध्ये आपसात इतर जातीतील लोकांपेक्षा जास्त मतभेद आहेत काही राज्यांमध्ये प्रादेशिक वाद निर्माण झाले असून वेगळ्या राज्यांच्या मागणीसाठी उग्र आंदोलने होत आहेत. लोक एकदुसऱ्याविरुद्ध गदारोळ करत आहेत. त्यामुळे राष्ट्रांचे स्थैर्य धोक्यात आले आहे.

सुप्रिम कोर्टाच्या न्यायाधीशांच्या निर्णयाच्या संदर्भात आम्हाला असे वाटते की समान कायदा ही खरी समस्या नसून अशा प्रकारच्या कायद्याच्या अंमलबजावणीच्या माध्यमातून कोणतेही सकारात्मक परिणाम दिसून येत नाहीत आणि म्हणून ज्यात अपयश मिळाले तो मार्ग सोडून आम्हाला दुसऱ्या

## सामाजिक फूट : ब्रिटिशांचा वारसा

आज एकच विचारधारा (Common Feeling) आहे या बाबतीत बोलले जाते, की ती विचारधारा आमच्या देशात गेल्या शेकडो वर्षापासून अस्तित्वात होती. राष्ट्राचे विभिन्न समूह मिळूनमिसळून प्रेमाने सामाजिक जीवन जगत होते. त्या काळात समान नागरी कायद्यासारखी कोणतीही गोष्ट आस्तित्वात नव्हती. प्रत्येक समूहाची सांस्कृतिक ओळख भिन्न होती. प्रत्येक जण आपल्या धर्माच्या प्रथापरंपरेनुसार  विवाहाचे विधि पार पाडत असे. तरीदेखील राष्ट्रीय एकात्मता पूर्णत: अस्तित्वात होती.

भारतीय समाजातील समतोल समान नागरी आचार संहितेमुळे डळमळीत झाला नाही तर ब्रिटिश सरकारच्या धोरणामुळे फोडा आणि राज्य करा "Divide and rule" हा लेफ्टनंट जनरल कोक याचा सिध्दांत.

या अनपेक्षित परिस्थितीची सुरूवात व्हाईसरॉय भारत सरकार (१८६२–६३) लॉर्ड जेम्स् ब्रूस एल्गिन याच्या कारकीर्दित झाली होती. ब्रिटिश सरकारच्या सेक्रेटरी ऑफ स्टेट वूड याने लंडनहून दिल्ली येथे स्थित व्हाईसरॉयला पुढीलप्रमाणे पत्र लिहिले होते:

हिंदुस्तानमध्ये एका समूहाला दुसऱ्या समूहाविरुद्ध लढवत आम्ही आमचे अस्तित्व टिकवले आहे. आम्ही ते चालू ठेवले पाहिजे. यासाठी लोकांना एकात्मतेच्या भावनेपासून (Common Feeling) दूर ठेवण्यात यावे. यासाठी जे काही करता येईल ते करावे. (दि हिंदुस्तान टाईम्स, ३० मार्च, १९९५).

We have maintained our power in India by playing off one part against the other and we must continue to do so. Do all you can, therefore, to prevent all having a common feeling.

ब्रिटीशांचे हे धोरण होते. या धोरणाड्झद्वारे सरकारच्या माध्यमातून [illegible]

## समान आचार संहिता :
## सामाजिक ऐक्याचे माध्यम नाही!

समान आचार संहितेचा राष्ट्रीय अथवा सामाजिक एकतेशी काही संबंध नाही. एकाच आचार संहितेचे पालन करणारे पुन:पुन्हा आपसात लढत राहिले. उदाहरणार्थ प्राचीन भारतात कौरव, पांडव हे नात्यागोत्यातील होते. त्यांची आचार संहिता एक होती. असे असतानादेखील दोघांमध्ये ते महायुद्ध झाले ज्याला महाभारत म्हटले जाते. भारतीय जनता पार्टीने घोषित केले आहे की सरकारवर कब्जा करण्यासाठी येत्या निवडणुकीत अशाच प्रकारच्या भावनेने "Killer instinct" महाभारत घडवण्यात येईल. (टाईम्स ऑफ इंडिया, २४ जुलै, १९९५) या नव्या महाभारताचे दोन्ही समूह एकच आहेत

ज्यांची आचार संहिता एकच आहे.

पहिले महायुध्द (१९१४-१८) मध्ये झाले. एका बाजूला जर्मनी आणि इटली यासारखे देश होते. तर दुसऱ्या बाजूला ब्रिटानिया आणि फ्रांस इत्यादी. देश होते. दोन्ही पक्षांमध्ये रक्तरंजित युद्ध झाले. या उद्ध्वस्त करणाऱ्या युध्दामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची आणि जखमी होणाऱ्यांची संख्या ३० दशलक्ष होती. हे दोन्ही पक्ष ख्रिश्चन धर्माचे होते. दोघांची एकच आचारसंहिता होती. परंतु ही कायद्यातील समानता दोघांना युध्दापासून परावृत्त करू शकली नाही.

भारताचे भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी यांची १९८४ मध्ये काही लोकांनी निर्घृण हत्या केली. मारेकरी आणि मृत्युमुखी पडणाऱ्याची आचारसंहिता एकच होती. पंजाबमध्ये वेगळेपणासाठी रक्तरंजित आंदोलन झाले. ज्या दोन समूहात झाले ते एकाच आचार संहितेचे पालन करणारे होते. प्रत्येक दिवशी वृत्तपत्रात पती पत्नी यांच्यातील क्रूर अत्याचारासंबंधी बातम्या प्रसिद्ध होत असतात. दोघांची आचारसंहिता एकच असते. न्यायालयात एकदुसऱ्याविरुद्ध कोट्यवधी लोक गंभीर आरोप ठेऊन कायदेशीर युद्ध लढत आहेत.

वस्तुस्तिथी ही आहे की, लोकांमध्ये सामंजस्य आणि ऐक्याची भावना निर्माण करण्यामध्ये समान नागरी कायदा निरुपयोगी सिद्ध झाला आहे

## बुद्धिवंतांची प्रतिक्रिया

भारताच्या सुप्रिम कोर्टात खंडपीठाचा निवाडा (१० मे, १९९५) वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला. त्यावेळी देशातील बुद्धिवादी आणि देशवासियांनी त्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. एका समूहाने त्याचे स्वागत केले आणि तो राष्ट्राच्या सद्याच्या सामाजिक प्रश्नांवर तोडगा आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. मात्र त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर असेही लोक होते, ज्यानी ते अमान्य केले. या दुसऱ्या समूहाचे संदर्भ खाली देण्यात आले आहेत.

1. Politics of Uniform Civil Code
by Partha S. Ghosh
*The Hindustan Times,* New Delhi, May 22, 1995
2. Living with Religion
by Kuldip Nayyar
*The Statesman,* New Delhi, May 31, 1995
3. Uniform Civil Code : Judiciary Oversteps its Brief
by H. M. Seervai
*The Times of India,* New Delhi, July 5, 1995
4. Personal Laws : Uniformity not Essential
by Balraj Puri
*Indian Express,* New Delhi, July 6, 1995
5. Civil Code : The Constitutional Perspective
by K. C. Markandan
*The Hindustan Times,* New Delhi, June 19, 1995

उदाहरण म्हणून श्री बलराज पुरी यांच्या लेखातील खालील उतारे इथे उद्‌घृत करण्यात आले आहेत. त्यानी समान नागरी कायद्यास पूर्णत: रद्दबातल केले आहे. त्यानी लिहिले आहे.

“सुप्रिम कोर्टाच्या आदरणीय न्यायाधीशांनी राष्ट्रीय एकात्मतेची जी संकल्पना मांडली आहे आणि त्याच्या समर्थनात त्यानी जे संकेत दिले आहेत. त्यावर माझी असहमती मूलभूत स्वरुपाची आहे. माझ्या दृष्टीने त्यामुळे राष्ट्रीय बांधणीच्या त्याचप्रमाणे मुस्लिम आणि इतर जमातीमध्ये, हिंदू लोकांमध्ये होत असलेल्या चर्चेच्या प्रक्रियेवर परिणाम होईल. जोपर्यंत समान नागरी कायदा अंतर्भूत करण्यात येत नाही तोपर्यंत मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करता येणार नाही. माननीय न्यायाधीशांनी मुस्लिम स्त्रीया मुस्लिमांची वेगळी ओळख असावी या भावनेस दुय्यम दर्जा दिला. आणि अशाप्रकारे त्यांनी एका चांगल्या उद्देशावर घोर अन्याय केला.”

एकात्मता आणि सुधारणा तर्कसंगत नाही. राष्ट्राच्या घटनेतील राज्यस्तरीय यादीत ६६ नोंदी आहेत आणि राज्यांना वेगवेगळे कायदे करण्यासंबंधी दिलेल्या अधिकाराच्या यादीत ४७ नोंदी आहेत. त्यामध्ये साम्य असणे गरजेचे नाही. राज्याच्या भौगौलिक आणि सांस्कृतिक विविधतेवर आधारित भिन्न कायदे यापासून देशाच्या एकात्मतेस कोणताही धोका नाही.

कोणताही समूह धर्माच्या नावाखाली स्वत:साठी वेगळ्या अस्तित्वाची मागणी करू शकत नाही. असा न्यायाधीश कुलदीप सिंग यांचा दावा आहे. तथापी आम्ही भाषेच्या नावांखाली वेगळ्या अस्तित्वाची मागणी केली नाही का? आणि भाषेवर आधारित देशाची रचना नव्याने करण्यात आलेली नाही का? त्यानुसारच भाषेवर आधारित राज्यांना मान्यता दिलेली आहे.

या पार्श्वभूमीवर आदरणीय न्यायाधीश केवळ धार्मिक समूहाला वेगळी ओळख देण्यासंबंधी त्यांचा दावा फेटाळत आहेत. ही बाब तर्कसंगत नाही. सामाजिक आणि राजकीय दृष्टीकोनांतून मान्यताप्राप्त हक्कांच्या विरुद्ध आहे. काय ही ओळख केवळ एका न्यायाधीशांच्या उद्घोषणेमुळे संपुष्टात येईल? (इंडियन एक्सप्रेस ६ जुलै, १९९५)

There is absolutely no logical connection between uniformity and reform. The case against the former is as unassailable as it is for the latter. Nor is uniform law imperative, as the judges argue, for the promotion of national unity and solidarity. There are a number of 66 entries in the State List and 47 in the Concurrent List of the Constitution on which States are empowered to make laws without any obligation to conform to uniformity. If diversity of laws, based on geographical and cultural diversities of the States, has not threatened the unity of the country, would it be threatened only if the diversities are of non-territorial form as are religious communities?

Justice Kuldip Singh has proclaimed that no community

could claim to remain a separate entity on the basis of religion. Have not we conceded separate entities based on languages and reorganised the country on a linguistic basis? Have not caste-based identities been recognised in the Mandal principle and all identities, cultural, tribal, caste and religious acquired political legitimacy? Why does the honourable judge single out the claim of a religious community for a distinct identity? It defies logic and socially and politically the accepted reality. Can this identity

## गुरू गोळवलकर यांचा विरोध

आर. एस. एस. चे भूतपूर्व सरसंघचालक गुरु गोळवलकर यांनी २० ऑगस्ट, १९७२ रोजी दिल्ली येथे दीनदयाळ रिसर्च इन्स्टीट्युटचे उद्‌घाटन केले. या प्रसंगी भाषण करताना ते म्हणाले, की राष्ट्रीय एकात्मतेसाठी समान नागरी कायद्याची गरज नाही. त्यांच्या या भाषणाचा वृत्तांत मदरलैंड या पत्रकात (२१ ऑगस्ट, १९७२) प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यानंतर साप्ताहिक ऑर्गनायझरच्या (२५ ऑगस्ट, १९७२) अंकात याच विषयावर त्यांची एक सविस्तर मुलाखत प्रसिद्ध करण्यात आली. त्यांनी जे सांगीतले त्याचा थोडक्यात खुलासा असा “मी समजत नाही की राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करण्यासाठी आम्हाला समान नागरी कायद्याची गरज आहे.” अशा प्रकारच्या कायदेशीर एकात्मतेचा राष्ट्रीय एकात्मतेशी काहीही संबंध नाही. केवळ एक दुसऱ्याच्या वैचारिक बैठकीत समानता असणे आवश्यक आहे. दीर्घ काळापासून आम्ही एक शक्तिशाली आणि ऐक्य असलेले राष्ट्र म्हणून राहतो आहोत. सर्व नागरीकात हिंदू आणि बिगर हिंदू लोकांमध्ये राष्ट्रीयत्व आणि बंधुप्रेमाची त्याचप्रमाणे त्यानी आपल्या धर्माप्रमाणे मातृभुमीवर प्रेम करावे अशी भावना निर्माण करण्याची गरज आहे.

ऑर्गनायझरच्या २६ ऑगस्ट, १९७२ च्या अंकात गुरू गोळवलकर यांची प्रसिद्ध करण्यात आलेली मुलाखत पुढे देण्यात आली आहे.

## Golwalkar on Uniform Civil Law

On August 20, 1972, Shri Guruji, Sarsanghachalak, RSS, inaugurated the Deendayal Research Institute in Delhi. On this occasion he said that a uniform civil code was not necessary for national unity. The Motherland of New Delhi carried the following report on August 21, 1970

> New Delhi, August 20—Shri M.S. Golwalkar, Sarsanghachalak of Rashtriya Swayamsevak Sangh, said here today that the present-day Indian politicians lacked original thinking on the problems of Indian society.

Shri Guruji was speaking at the inauguration of the Deendayal Research Institute and the celebration of Sri Aurobindo Centenary by the Institute. Shri R.R. Diwakar, President, Gandhi Peace Foundation, presided. A huge elite audience attended the function in front of the Institute building on Rani Jhansi Road, Jhandewala.

Citing the example of politicians' efforts to solve problems without thinking, he referred to the question of uniform civil code for all in the country, and said that such a uniformity was not necessary in itself; Indian culture permitted diversity in unity. 'The important thing is to infuse a spirit of intense patriotism and brotherhood among all citizens, Hindu and non-Hindu, and make them love this motherland according to their own religion.

In a special interview with Organiser, Shri Guruji reiterated his above view. Here is the substance of the conversation, as published in that paper's issue of August 26,

1972:

**Q.** You don't think that a uniform civil code is necessary for promoting the feeling of Nationalism?

**A.** I don't. This might surprise you or many others. But this is my opinion. I must speak the truth as I see it.

**Q.** Don't you think that uniformity within the nation would promote national unity?

**A.** Not necessarily. India has always had infinite variety. And yet, for long stretches of time, we were a very strong and united nation. For unity, we need harmony, not uniformity.

**Q.** In the West the rise of nationalism has coincided with unification of laws and forging of other uniformities.

**A.** Don't forget that Europe is a very young continent with a very young civilizations. It did not exist yesterday and it may not be there tomorrow. My feeling is that nature abhors excessive uniformity. It is too early to say what these uniformities will do to Western civilizations in times to come. Apart from the here and the now, we must look back into the distant past and also look forward to the remote future. Many actions have long-delayed and indirect consequences. We in this country have millennia of experience. We have a tested way of life. And our experience is that variety and unity can, and do, go together.

**Q.** A Directive Principle of State Policy in our Constitution says that the State would strive for a uniform civil code.

**A.** That is all right. Not that I have any objection to a uniform civil code, but a thing does not become desirable just

because it is in a Constitution. In any case our Constitution is a hotch-potch of some foreign constitutions. It has not been conceived and drafted in the light of Indian experience.

**Q.** Don't you thing that Muslims are opposing a uniform civil code only because they want to maintain their separate identity?

**A.** I have no quarrel with any class, community or sect wanting to maintain its identity, so long as that identity does not detract from its patriotic feeling. I have a feeling that some people want a uniform civil code because they think that the right to marry four wives is causing a disproportionate increase in the Muslim population. I am afraid this is a negative approach to the problem.

The real trouble is that there is no feeling of brotherliness between Hindus and Muslims. Even the secularists treat the Muslims as a thing apart. Of course their method is to flatter them for their bloc votes. Others also look upon them as a thing apart, but they would like to flatten out the Muslims by removing their separate identity. Basically there is no difference between the flatterers and the flatteners. They both look upon Muslims as separate and incompatible.

My approach is entirely different. The Muslim is welcome to his way of life so long as he loves this country and its culture. I must say the politicians are responsible for spoiling :he Muslims. It was the Congress which revived the Muslim Leage in Kerala and thus caused the increase of Muslim communalism throughout the country.

**Q.** If we carry this argument backwards, even the

codification of the Hindu law would be considered unnecessary and undesirable.

**A.** I certainly consider the codification of Hindu law as altogether unnecessary for national unity and national integration. Throughout the ages we had countless codes—and we were not any the worse for them. Till recently Kerala had the matriarchal system. What was wrong with that? All law-givers. ancient and modern, are agreed the custom does, and must, prevail over the law.

"Custom is more effective than shastras", say the shastras. And custom is the local or group code. All societies recognise the validity of the local custom or code.

**Q.** If a uniform civil law is not necessary, why is a uniform criminal law necessary?

**A.** There is a difference between the two. The civil law concerns mainly the individual and his family. The criminal law deals with the law and order and thousand other things. It concerns not only the individual but also the society at large.

**Q.** Would it really be correct to allow our Muslim sisters to remain in purdah and be subjected to polygamy?

**A.** If your objection to Muslim practices is on humanitarian grounds, then that becomes a valid objection. A reformist's attitude in these matters is allright. But a mechanical leveller's attitude would not be correct. Let the Muslims evolve their old laws. I will be happy when they arrive at the conclusion that polygamy is not good for them, but I would not like to force my view on them.

**Q.** This seems to be a deep philosophical question.

**A.** It very much is. I think uniformity is the death-knell of nations. Nature abhors uniformity. I am all for the protection of various ways of life. However, all this variety must supplement the unity of the nation and not range itself against it.

(Reproduced from Manthan, New Delhi, July 1986)

# निसर्ग नियम

जौक दहेलवी (१७८९-१८५४) हे उर्दु भाषेचे ख्यातनाम कवी. त्यांचा एक शेर असा आहे :

गुल है रंग, रंग से है जीनत-ए-चमन
ऐ जौक, इस जहान को है जेब इख्तेलाफ से

(विविध रंगाच्या आणि आकाराच्या फुलांमध्येच बागेचे सौंदर्य आहे. हे जौक! विविधतेतच या जगाचे सौंदर्य आहे!) हा निसर्गाचा नियम आहे. तुम्ही बागेत उभे राहून पाहिले तर प्रत्येक रोपटे, प्रत्येक झाड इतरांहून वेगळे असते. प्रत्येक झाडाची फुले त्यांच्या गुणधर्मानुसार त्यांच्या सौंदर्याचे दर्शन घडवतात. संपूर्ण बागेत विविधता असते. पक्षीदेखील वेगवेगळ्या आवाजात गात असतात. निसर्ग विविधतेचे अद्धितीय उदाहरण आहे.

विश्वाच्या सर्वच गोष्टींमध्ये ही विविधता आढळून येते, त्याचप्रमाणे माणसांमध्येदेखील जीवशास्त्र आणि मानसशास्त्र यांच्यानुसार एक माणूस दुसऱ्या माणसापेक्षा पूर्णत: वेगळा आहे. केवळ अंगठ्याचे ठसेच नाही तर माणसाच्या शरीरातील पेशीदेखील एकदुसऱ्यांपासून भिन्न असतात. एका माणसाचे डोळे दुसऱ्या माणसाप्रमाणे नसतात. हा घटक किंवा विविधता केवळ बाह्य सौंद्र्यासाठी नाही. यामागे फार मोठे बुद्धिकौशल्य आहे. खरे पाहाता ही विविधता आणि भिन्नता यांच्याशीच माणसाची प्रगती निगडित आहे. यामुळे निरनिराळे शोध लावण्यात आपणास सहाय्य झाले. यातूनच वैचारिक मतभेद निर्माण झाले आणि त्यामुळे बौद्धिक विकास झाला. सभेमध्ये सहभागी एकाच विचारप्रणालीचे सर्व लोक असल्यास कोणताही विचार पुढे येणार नाही. सर्व इंजिनिअर्सना एकाच साचामध्ये काम करावयास

लावल्यास ते कोणत्याही नवीन तंत्रज्ञानाचे संशोधन करू शकणार नाहीत. समाजामध्ये एकाच प्रकारचे सर्व लेखक असतील तर अभिजात वाङ्‌मयाची निर्मिती होणार नाही. सर्व राजकारणी मंडळींना एकाच पद्धतीने घडवण्यात आले, तर कोणताही अर्थपूर्ण राजकीय विकास होणार नाही.

विविधता आणि भिन्नता हा संपूर्ण जीवनात कार्यरत निसर्गाचा सामान्य नियम आहे. त्यामध्ये बदल करण्याचे सामर्थ्य कोणत्याही व्यक्तीत नाही. जबरदस्तीने जर त्यात बदल करण्याचा कोणी प्रयत्न केला, तर कृत्रिम क्रिया करण्यात आलेली व्यवस्था रद्दबातल करून निसर्गच विविधतेची पुनर्स्थापना करील.

## अशक्य!

वास्तविक पाहाता, समान नागरी कायदा हे एक अशक्य स्वप्न आहे घटनेच्या कलम ४४ आणि कलम ३७१-ए याचे समर्थन करणारा पुरावा आहे.

शासनाकडून भारतात सर्व प्रदेशात समान नागरी कायदा लागू करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे घटनेच्या कलम ४४ मध्ये नमूद करण्यात आले आहे हे आपणास माहित आहे.

No Act of Parliament in respect of (Naga customary laws) shall apply to State of Nagaland unless the Legislative Assembly of Nagaland by a resolution so decides (371-A).

तरी अपवाद म्हणून घटनेमध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली आहे. जोपर्यंत नागालँडच्या विधिमंडळात ठरावाद्वारे निर्णय होत नाही, तोपर्यंत नागांच्या धार्मिक अथवा सामाजिक प्रथापरंपरा, पारंपारिक कायदे आणि प्रथा या संदर्भात संसदेचा कोणताही कायदा नागा राज्यास लागू करता येणार नाही.

वास्तविक ही कलमें परस्पर विरोधी आहेत. आमच्या घटनाकारांची सविस्तर घटना करण्याची कल्पना हेच या विरोधास कारणीभूत आहे आणि म्हणूनच घटना समितीचे एक ज्येष्ठ सदस्य सर अल्लादी कृष्ण स्वामी एका भाषणात म्हणाले, भावी विधिमंडळाकडून समान नागरी कायदा करण्यात

येईल, अथवा करण्यात येणार नाही.

The future Legislatures may attempt a uniform civil code [illegible] (Sir Alladi Krishnaswami Ayyar)

## कायद्याच्या मर्यादा

कोणत्याही कायद्याला मर्यादा आहेत. मानवनिर्मित प्रथा परंपरांनादेखील मर्यादा आहेत. काही ठराविक मर्यादेनंतर समाजावरील त्यांची पकड नाहीशी होते.

१९७५ मध्ये अलाहबाद हाय कोर्टाकडून एक निकाल देण्यात आला. या निकालाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्धबातल करण्यात आली. त्याचप्रमाणे पुढील वर्षांसाठी कोणतीही निवडणूक लढवण्यात त्यांना प्रतिबंध करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात काय घडले. आणीबाणी जाहीर करून इंदिरा गांधी अधिक प्रभावशाली बनल्या आणि केंद्र सरकारमधील त्यांचे स्थान त्यांनी अधिक मजबूत केले.

१९८६ मध्ये उत्तर प्रदेश न्यायालयाने दिलेल्या एका निवाड्यानुसार हिंदूंना धार्मिक विधी पार पाडता यावेत या हेतूने बाबरी मशीदीचे दरवाजे उघडण्यात आले. हिंदू, मुस्लिम यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध निर्माण व्हावेत, हे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात त्यामुळे हिंदू मुस्लिमांमध्ये असलेल्या चांगल्या संबंधांचे अंध:पतन झाले आणि देश राजकीय आणि आर्थिक संकटात सापडला.

१९८५ मध्ये सुप्रिम कोर्टाने शाहबानो प्रकरणी निकाल दिला. महिलांना न्याय मिळावा हा त्यामध्ये हेतू होता. मात्र त्याचा पूर्णत: विपरित परिणाम झाला. एक कायदा संमत करून राजीव सरकारने या निवाड्यास रद्धबातल केले. भारतीय जनता पक्षाने याचा गैरफायदा घेतला. यामुळे संसदेत त्यांच्या सदस्यांची संख्या २ वरून ११९ झाली. आणि काही राज्यात त्यांचे सरकार सत्तेत आले. १९५५ च्या हिंदू कोड बिलानुसार हिंदू पुरुषास एकाच पत्नीची अनुमती आहे. मात्र १९६१ च्या भारतीय शिरगणती नुसार मुस्लिमांपेक्षा एकाहून अधिक पत्नी आहेत अशा हिंदु पुरुषांची संख्या अधिक असल्याचे

निष्पन्न झाले.

According to the Indian census report of 1961, the percentage of Hindus having more than one wife was more than that of the Muslims.

ब्रिटिशांच्या सुमारे २०० वर्षांच्या राजवटीने ब्रिटिशांनी ५०० च्या जवळपास कायदे केले. १९४७ मध्ये सत्ता मिळाल्यानंतर ४५ वर्षांच्या कालावधीत आपण ५००० हून अधिक कायदे केले. असंख्य सुधारणावादी कायदे निष्फळ ठरले. वाद प्रतिवाद आणि मतभेद वाढत गेले. भ्रष्टाचार शिगेस पोहोचला. न्याय मिळवणे अत्यंत कठीण काम होऊन बसले. महिलांची दैनावस्था अधिक बिघडली. म्हणून अशा प्रकारे कायद्यांची संख्या

## धर्मांतराचा प्रश्न

सुप्रिम कोर्टाच्या एका खंडपीठापुढे श्रीमती सरला मुद्‌गल यांच्या नेतृत्वाखालील कल्याणी नावांच्या एका संघटनेच्या सहाय्याने चार महिलांनी अर्ज केला. अप्रत्यक्षपणे त्याचा समान नागरी कायद्याशी संबंध होता. त्यानी असे निवेदन केले, की इस्लाम धर्माचा स्वीकार करून आपल्या पहिल्या पत्नीला घटस्फोट न देता त्यांनी दुसऱ्यांदा विवाह केला. विवाहसंबंधी कायद्याचा फायदा घेणाच्या हेतूने आणि त्या मार्गाने दुसरी पत्नी करता यावी यासाठी त्यांनी इस्लामचा स्वीकार केला आपल्या पतींचे अशा प्रकारे त्यांनी केलेले दुसरे लग्न बेकायदेशीर ठरवण्यात यावे अशी विनंती संबंधित महिलांनी न्यायालयास केली होती.

न्यायालयाने अर्ज दाखल करून घेतला. चौघांचे दुसरे लग्न बेकायदेशीर असल्याचा निवाडा दिला आणि पहिल्या पत्नीकडे परत जाण्यासंबंधी निर्देश दिले. सदरहू निवाडा देतांना आपल्या निकालपत्रात न्यायाधीश कुलदिप सिंग म्हणतात.

“ भारतातील नागरीकांसाठी समान नागरी कायद्याचे ध्येय साकारले जात नाही तोपर्यंत हिंदू पतींसाठी पहिली पत्नी असताना दुसरे लग्न

करण्यासाठी मुस्लिम होण्याचे खुले प्रलोभन आहे. भारतात एक पत्नीत्व/एक पतीत्व (Monogamy) हा हिंदुत्वासाठी कायदा आहे तर मुस्लिमांना चार पत्नी करण्याची अनुमती आहे. हिंदु कायद्यातील तरतुदींना बगल देण्यासाठी आणि गुन्हेगारीच्या परिणामातून सुटका करण्यासाठी हिंदू पती इस्लामचा स्वीकार करतात.'' (पुष्ठ क्र. ५)

एका धर्मांच्या कायद्यातील तरतुदी टाळण्यासाठी त्याचप्रमाणे दुसऱ्या धर्मातील कायद्यातील तरतुदींचा गैरफायदा घेण्याचे थांबवण्यासाठी समान नागरी कायद्याची आवश्यकता आहे. या विचाराच्या समर्थनार्थ हिंदुस्तान टाईम्सच्या २१ जून, १९७५ च्या अंकात चमनलाल वर्मा यांचे एक पत्र प्रकाशित करण्यात आले आहे.

A uniform civil code is required to prevent the misuse of religion to evade the provisions of one law to take advantage of those of another.

जुन्या कायद्यांचा गैरफायदा घेण्यास प्रतिबंध करण्यासाठी नवीन कायद्याचा काहीही उपयोग नाही. कायदाभंग करण्याची संधी नेहमीच उपलब्ध असते. कर चुकवेगिरी थांबवण्यासाठी अनेक कायदे आणि नियम आहेत. तरीदेखील कर चुकवेगिरी मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहे. कोणत्याही कायद्याचा गैरफायदा घेणे शक्य नाही. अशा परिस्थितीत  नागरी कायद्याचा गैरफायदा घेणे कशा प्रकारे थांबवणे शक्य आहे?

उपरनिर्दिष्ट निवाडा इंडियन पिनल कोडच्या ४९४ व्या कलमाखाली देण्यात आला आहे. अशा प्रकारचे प्रतिबंधित करणारे कायदे अस्तित्वात आहेत. संबंधित प्रचलित कायद्यामध्ये गुन्हा करणाऱ्या हिंदूसाठी कोणतेही प्रलोभन नाही. आणि म्हणून प्रतिबंधनाखाली समान नागरी कायद्याची आवश्यकता नाही.

The court's own ruling shows that no such inducement is available to an "errant Hindu" even under exiting law. You do not need a civil code to deter him.

## कलम ४४ रद्द करण्यास योग्य

वरील विश्लेषण आणि युक्तिवाद यावरून घटनेचे ४४ वे कलम कायदेशीररित्या अर्थहीन आहे आणि त्यास नैतिक मूल्य नाही हे सिद्ध होते. काही लोकांच्या कल्पनेचा तो भाग आहे आणि म्हणून निरोगी शरीरासाठी अपायकारक अपेंडिक्सवर शस्त्रक्रिया करून काढून टाकतात त्याप्रमाणे हा कायदाही काढून टाकण्यात यावा.

अशा प्रकारचे घटनात्मक अपेंडिक्स काही नवीन नाही. घटनेतून एखादी बाब पुन:पुन्हा गाळून टाकणे, अथवा एखादी बाब त्यामध्ये नव्याने समाविष्ट करणे भारतीय घटनेसाठी नवीन नाही. उदाहरणार्थ खाजगी मालमत्ता हा घटनेच्या सुरुवातीस एक पवित्र हक्क समजला जात होता. मात्र १९५५ मध्ये चौथी घटनादुरूस्ती करण्यात आली आणि कोणचीही वैयक्तिक कायदेशीर मालमत्ता हस्तगत करण्याचा हक्क शासनास बहाल करण्यात आला. मोबदला म्हणून बाजारभावापेक्षा मालकास कमी किंमत देण्यात आली असली तरी धारकास न्यायालयात अपील करण्याचा हक्कदेखील हिराऊन घेण्यात आला.

याचप्रमाणे १९६१ मध्ये २६ व्या घटनादुरुस्ती अन्वये राजेमहाराजे यांना घटनेने दिलेला प्रिव्हि पर्सेसचा हक्कदेखील काढून घेण्यात आला. आणि त्यासंदर्भातील घटनात्मक सर्व हक्कदेखील रद्दबातल करण्यात आले.

वरील उदाहरणावरून घटनादुरुस्ती करून कलम ४४ रद्दबातल करणे काही विलक्षण बाब ठरणार नाही. अशा प्रकारे पाऊल टाकल्यास त्यापासून

## सम-सांस्कृतिक राष्ट्र कि बहुविध - सांस्कृतिक राष्ट्र

या देशाची जडणघडण करण्यासाठी गेली शंभर वर्षे दोन वेगळे राजकीय समूह भारतात कार्यरत आहेत. प्रत्येकाची वैचारिक भिन्न बैठक आहे.

एक समूह निधर्मीवादाचा पुरस्कर्ता तर दुसरा समूह हिंदूत्ववादाचा पुरस्कर्ता आहे. दोन्ही समूहाची वैचारिक बैठक भिन्न असली तरी भारतामध्ये सर्वांसाठी समान नागरी कायदा असावा या बाबतीत दोघांचे एकमत आहे, हा एक विरोधाभास आहे. नि:पक्षपातीपणे पाहिल्यास समान नागरी कायदा दोन्ही समूहाच्या विचारसरणी विरुद्ध आहे. आपल्या तत्वप्रणालीशी ते प्रामाणिक असतील तर त्यांनी समान नागरी कायद्यास पाठिंबा देऊ नये.

धार्मिक बाबींमध्ये शासनाने हस्तक्षेप करू नये. या धोरणाचा पुरस्कार करणे म्हणजे निधर्मीवाद, श्रद्धा आणि धर्म स्वातंत्र्यांच्या तत्वप्रणालीनुसार शासनाने सर्वसामान्य व्यावहारिक बाबींचे प्रशासन करणे अपेक्षित आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर निधर्मवादाची ही संकल्पना मान्यताप्राप्त आहे. भारताची घटना याच तत्त्वप्रणालीवर तयार करण्यात आली आहे.

काही लोक निधर्मीवाद म्हणजे एक धर्मच आहे असे समजतात. प्रचालित धर्मावाचून खाजगी त्याचप्रमाणे सार्वजनिक जीवनांतील सर्व बाबी निधर्मवादात समाविष्ट आहेत. मात्र हा अतिरेक आहे. सर्व धार्मिक समुहात आणि नैतिक व्यवस्थेत याचा शोध घ्यावा लागेल. इस्लाम हा केवळ राजकारणासाठी आणि युद्धासाठी आहे असा त्याचा अर्थ अतिरेकी लावतात. मात्र ही अतिशयोक्ती आणि धर्मवेडेपण आहे. इस्लामच्या खऱ्या प्रतिनिधत्वापासून हे खूप दूर आहे. निधर्मीवाद आणि समान नागरी कायदा या दोन भिन्न संकल्पना आहेत. ही वस्तुस्थिती आहे. भारतातील निधर्मीवादी समूह सत्य असेल तर त्याने समान नागरी कायदा संदर्भात काही बोलू नये. धार्मिक स्वातंत्र्य आणि खाजगी व्यवहारात निधर्मीवादाची तत्त्वप्रणाली आहे.

दुसऱ्या समूहाचे लोक जे हिंदू तत्वप्रणालीचा पुरस्कार करतात त्यांनी हे लक्षात घ्यावे, की विविध जातीजमातींना समान कायद्या अंतर्गत समाविष्ट करुन घ्यावे हे त्यांच्याच संकल्पने विरुद्ध आहे.

'सर्व धर्म समभाव' हे हिंदू धर्माचे मूलभूत तत्त्व आहे. विविधतेत एकता यावर विश्वास ठेवणे हा हिंदुत्वाचा मूलभूत गुणधर्म आहे. बाह्यत: वस्तुस्थितीस अनेक पैलू असले तरी अंतरंग एकच आहे. नागरी कायदा अथवा कोणताही कायदा याचा संबंध अंतरंगाशी नाही. आणि म्हणून विविध

समूहाचे व्यक्तिगत कायदे रद्दबातल करून एकच नागरी कायदा लादण्याचा प्रयत्न करणे हे हिंदू दृष्टीकोनाच्या विरुद्ध आहे.

सर्व पाश्चिमात्य विकसित राष्ट्रे (उदा. ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स इ.) बहुविध सांस्कृतिक राष्ट्र या तत्त्वाचे पालन करतात. सिंगापूरसारख्या लहान देशापासून अमेरिकेसारखे मोठे देशदेखील याच तत्त्वाचा पुरस्कार करून विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहेत. मात्र सोव्हिएन युनियन (रशिया) हे एकच असे. राष्ट्र आहे ज्याचा समान सांस्कृतिक राष्ट्र या तत्वावर विश्वास होता. याच्या सिद्धतेसाठी रशियन शासनाने सर्व सामर्थ्य पणास लावले, मात्र

## वाढत्या लोकसंख्येचे बुजगावणे

हिंदुस्तान टाईम्स वृत्तपत्राने १७ जुलै, १९९५ रोजी केलेल्या एका सर्वेक्षणाच्या संदर्भात अनेक ज्येष्ठ नागरीकांनी विवाहासारख्या बाबी या खूप खाजगी स्वरूपाच्या आहेत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. एखाद्या जमातीची त्यांच्या रीतीरिवाजाशी बांधीलकी असेल तर दुसऱ्या जमातीच्या लोकांना त्यास हरकत घेण्याचे काय कारण आहे?

अशा प्रकारचा कायदा करणे अशक्य आहे, हे माहित असताना देखील निवडणुकीमध्ये याच विषयास प्रामुख्याने प्राधान्य देण्यात येते. एक तोडगा म्हणून राजकीय फायद्यासाठी त्याचा विपर्यास करण्यात येतो. मुस्लिमांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यादेशात पुढील शतकाच्या मध्यंतरी मुस्लिम बहुसंख्य आणि हिंदू अल्पसंख्य असतील असा प्रचार करण्यात येतो.

या निराधार प्रचाराच्या समर्थनार्थ असे सांगण्यात येते, की स्वातंत्र्या नंतर करण्यात आलेल्या हिंदु विवाहासंबंधी एक पत्नीत्वाच्या कायद्यामुळे हिंदूंची संख्या कमी होईल. या उलट १८६० च्या मुस्लिम व्यक्तिगत कायद्याने मुस्लिमांना चार पत्नी करण्याची परवानगी देण्यात आल्यामुळे त्यांच्या संख्येत वाढ होईल. म्हणजेच एका हिंदु पेक्षा एक मुस्लिम चारपट अधिक मुलांना जन्म देईल. हिंदुंची संख्या गणितीय पद्धतीने तर मुस्लिमांची संख्या भौमीतिक पद्धतीने वाढेल. असे भयावह चित्र पुढे करून हिंदूमध्ये प्रचारकर्ते

आपली मतपेटी मजबूत करण्याचा प्रयत्न करीत असतात. या प्रचारास कोणताही आधार नाही. जन्माचे प्रमाण समाजातील प्रजननक्षम स्त्रीयांच्या संख्येवर अवलंबून असते. सर्वसाधारणत: मुस्लिम एकाच महिलेशी विवाह करतो. माझ्या आयुष्यात मला तरी अद्याप चार पत्नीधारक मुस्लिम पती आढळला नाही. स्त्रीयांची संख्या पुरुषांच्या संख्येच्या चौपट झाली तरीही हे शक्य नाही. सद्या मुस्लिम स्त्रीयांची संख्या मुस्लिम पुरुषांपेक्षा अधिक नाही. अधिक स्त्रिया निर्माण करण्याचा एखादा कारखानादेखील नाही. या संदर्भात बलराज पुरी यांचा एक परिच्छेद नमूद करण्यासारखा आहे.

“बहुपत्नीकत्वाच्या कायदेशीर तरतुदी आचारणात येत नसल्याचे एका पहाणीवरून लक्षात येते. स्त्रीयांबद्धल नॅशनल कमिशनच्या अहवालानुसार इतर जातींपेक्षा मुस्लिमांमध्ये बहुपत्नीकत्वाचे प्रमाण कमी आहे. बहुपत्नीकत्वामुळे मुस्लिमांची लोकसंख्या वाढेल हा मुद्धा तर्कदृष्ट्या भ्रामक आहे. कारण जन्म देणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण स्थिर आहे. जर काहीनी एकाहून अधिक स्त्रीयांशी विवाह केला, तर अनेक पुरुषांना लग्नासाठी स्त्रीयाच मिळणार नाहीत. प्रत्यक्षात चार स्त्रिया आणि चार पुरुष यांना होणाऱ्या संततीपेक्षा एकाच पुरुषांनी चार स्त्रीया केल्यास होणाऱ्या संततीचे प्रमाण कमी राहील आणि म्हणून बहुपत्नीकत्वामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात घट होते, वाढ होत नाही.” जुलै ६, १९९५ इंडियन एक्सप्रेस.

असे असले तरी निवडणुकीत मुस्लिमांची लोकसंख्या वाढ हा प्रमुख मुद्धा पुढे मांडण्यात येतो. मात्र या प्रचारास ईश्वराच्या या जगात यश प्राप्त होत नाही. हा प्रचार निराधार असल्याचा हाच पुरावा आहे.

## तडजोड, समानता नको!

भारतीय संसदेत १९५४ मध्ये विवाहसंबंधी कायदा संमत करण्यात आला. कोणत्याही धार्मिक विधीशिवाय पती आणि पत्नी यांनी मॅजिस्ट्रेट पुढे खास न्यायालयात नोंदणी करावयाची अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. जर समान नागरी कायदा संमत करण्यात आला तर सद्याच्या विवाहासंबंधी उपरनिर्दिष्ट विवाहासंबंधी खास कायद्याचाच तो

विस्तार असेल. या न्यायालयीन विवाह पद्धतीच्या कायद्याप्रमाणे दिल्लीमध्ये किती लोक विवाहबद्ध झाले? याचे मी सर्वेक्षण केले. त्यावेळी दोन जोडप्यांनी अशाप्रकारे लग्न केल्याचे मला आढळून आले. एक हिंदू आणि एक मुस्लिम परंतु. त्यांचे वैवाहिक जीवन अल्प ठरले. आता ते विभक्त झाले आहेत. माझ्या पुढील चौकशीत अहंभावामुळे त्यांना विभक्त व्हावे लागले हे समजले. क्षुल्लक कारणासाठी दोघांमध्ये भांडण होत असे. पुन:पुन्हा होणाऱ्या वादविवादामुळे अखेर त्यांना विभक्त व्हावे लागले. जपानवरील एका पुस्तकात "मी कोणाच्या तरी अधिपत्याखाली आहे असे जपानी पुरूषांना आणि स्त्रीयांना वाटते." या विचारामुळे जपानी पुरुष अथवा स्त्री आपल्या जोडीदाराबरोबर नेहमी तडजोड करतात. अमेरिकेत याउलट प्रकार आहे. अमेरिकेत पत्नी सर्वाधिक वाईट, तर जपानी स्त्री सर्वाधिक चांगली पत्नी असे म्हणतात. दोघांच्या वैवाहिक बैठकीत याचा खुलासा सापडतो. अमेरिकी स्त्रीयां समानतेच्या संकल्पनेने पछाडलेल्या आहेत. जपानी स्त्री समानता आणि असमानता या विचारापुढे गेल्या आहेत. मात्र तडजोडीच्या तत्वानुसारच आपणास राहावयाचे यावर जपानी स्त्रीयांचा विश्वास आहे. आणि म्हणून वैवाहिक जीवनात अमेरिकी स्त्रीया अयशस्वी तर जपानी स्त्रीया यशस्वी

## हिंदुच्या चालीरीती

हिंदुमध्ये विवाहासंबंधी एकच पद्धत अस्तित्वात नाही. शेकडो जमाती आहेत. प्रत्येक जमात आपल्या कौटुंबिक रूढी परंपरानुसार विवाह करतात. उदाहरणार्थ सचीन तेंडूलकर यांनी अंजली मेहता बरोबर २५ मे, १९९५ रोजी विवाह केला. विवाह पारंपारिक महाराष्ट्रीयन पद्धतीने करण्यात आला. (मे २६, १९९५, पायोनिअर).

१९५४ चा विवाहासंबंधी विशेष कायद्याचा पर्याय असला तरी बहुतेक हिंदु अद्याप धार्मिक पद्धतीनेच विवाह करतात. (मे २२, हिंदुस्तान टाईम्स्)

विवाह ही संपूर्णत: एक खाजगी बाब आहे. यामध्ये कुटुंबातील प्रत्येकाकडून आपल्या प्रथापरंपरा, रीतीरिवाज यांचे पालन करण्यात येते.

दुसरा कोणताही पर्याय शक्य नाही.

Almost all Hindus still solemnise their marriages through religious customs although there is a civil way out through the Special Marriages Act of 1954. (The Hindustan Times, May 22, 1995)

## राष्ट्रीय चारित्र्याची खरी गरज

भारतास एकसंघ, शांततावादी आणि विकसित देश बनवायचा असेल तर राष्ट्रीय चारित्र्याची गरज आहे. देशातील सर्व प्रकारच्या त्रुटी, भ्रष्टाचार याचे कारण स्वातंत्र्यनंतर राष्ट्रीय चारीत्र्य निर्माण करण्याची असमर्थता! राष्ट्रीय मार्ग आणि वैयक्तिक मार्ग एकदुसऱ्या विरुद्ध आहेत. दुसऱ्या प्रकारामध्ये राष्ट्रहितापेक्षा व्यक्तिगत हितास अधिक महत्व देण्यात येते. दोघांमध्ये ज्यावेळी मतभेद होतात, त्यावेळी राष्ट्रहितापेक्षा वैयक्तिक हितास दुय्यम स्थान दिले पाहिजे.

जर एखाद्या देशाने तुम्हाला विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली, तर तुम्ही तुमच्या देशासाठी अशी विक्री नाकारणे आवश्यक आहे. कर न भरणे हे तुमच्या हिताचे असले तरी देशाच्या विकासासाठी कर भरणे तुमचे कर्त्यव्य आहे. भेसळ केलेल्या पदार्थांपासून तुम्हाला अधिक नफा मिळतो. तुम्ही राष्ट्रीय विकासासाठी भेसळ करणे टाळले पाहिजे. वैयक्तिक हेवेदावे असले तरी राज्याच्या मालमत्तेस हानी पोहचऊ नये. देशाचे आर्थिक चक्र थांबवण्याचा प्रयत्न केल्यास राष्ट्राचे नुकसान होईल. निवडणुकीत तुमचा पराभव झाल्यास तो तुम्ही मनापासून स्वीकारला पाहिजे एखादी सत्तेची जागा मिळाल्यास त्यास कायमचे चिकटून राहाण्याची इच्छा बाळगू नये. तुम्ही नेते असाल तर तुम्ही तुमच्या वैयक्तिक निवडणुकीवरच लक्ष केंद्रित करू नये. मतपेटी " Vote Bank" साठी एखाद्या समुहात भीती अथवा द्वेष भावना निर्माण करू नये. असे केल्यास ती राष्ट्राची राजकीय दिवाळखोरी होईल.

राष्ट्राच्या विकासासाठी खऱ्या देशभक्तीची गरज आहे. आणि याचाच आपल्या देशात अभाव आहे. प्रत्येक जण राष्ट्रप्रेमांपेक्षा व्यक्तिगत प्रेमास

प्राधान्य देत आहे.

समान नागरी कायदा यासारख्या उथळ उपाययोजना करुन राष्ट्रप्रेम कधीही निर्माण होणार नाही. लोकांची विचारसरणी विधायक दिशेस वळवणे आवश्यक आहे. त्यासाठी ज्याकाही सुविधा उपलब्ध आहेत त्या माध्यमातून लोकांना शिक्षण दिले पाहिजे. बौद्धिक जागृती यासाठी मोहिम सुरू केली पाहिजे हे फार मोठे काम आहे. आणि त्यास पर्याय नाही.

## शिक्षणाचे महत्त्व

राष्ट्राच्या विकासासाठी शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. त्याच्या तुलनेत समान नागरी कायद्याचा प्रश्न निरर्थक आहे. अशा परिस्थितीत देशातील जनतेस शंभर टक्के शिक्षण दिले पाहिजे. तसे केले नाही तर महत्वाच्या बाबीऐवजी आपण क्षुल्लक बाबीस प्राधान्य देत आहोत असे होईल. ही राष्ट्रसेवा नसून तो एक अपराध आहे.

नोकरी मिळवणे हे शिक्षणाचे ध्येय नाही. शिक्षणामुळे जागृती आणि योग्य विचारसरणी निर्माण झाली पाहिजे.

कोणत्याही समाजात अथवा कोणत्याही राष्ट्रात योग्य विचारवंतांकडूनच सर्व विधायक घटनांना पूर्ण स्वरूप प्राप्त होते. योग्य विचारसरणीमुळे लोकांमध्ये दूरदर्शीपणा निर्माण होतो. त्या माध्यमातून एखादे प्रकरण कोणत्या प्रकारे हाताळण्यात यावे हे लक्षात येते. चांगले काम आणि वाईट काम यामध्ये फरक करता येतो. वास्तव समजते. चांगल्या कृत्यास उजाळा मिळतो. एखादा समुह अथवा व्यक्ती चांगल्या कृतीमुळेच

## खरी गरज कशाची?

विवाहासंबंधी समान रीतीरिवाजांमुळे समाजात एकात्मता अथवा ऐक्य याचे वातावरण निर्माण होत नसते. त्यासाठी विधायक विचारसरणी असलेल्या लोकांचीच आवश्यकता आहे. आता विधायक विचारसरणी म्हणजे काय हे आपण पाहू :–

एकदा स्वामी विवेकानंद (१८६३–१९०२) यांना एका ख्रिश्चन मित्राने घरी येण्याचे निमंत्रण दिले. बैठकघरात मित्राने स्वामींची विचारसरणी जाणून घेण्यासाठी विविध धर्मांचे ग्रंथ त्यांच्यासमोर ठेवले. त्यात रामायण सर्वात खाली ठेवण्यात आले होते बायबल सर्वात पुढे आणि इतर धर्मग्रंथ दोन्ही ग्रंथांच्यामध्ये! खोलीत स्वामी विवेकानंद यांनी प्रवेश केल्यानंतर मित्रांने पुस्तकांकडे त्यांचे लक्ष वेधले आणि सांगितले, तुमचे काय मत आहे? पुस्तक मांडण्याची पद्धत पाहून स्वामीजी हसले आणि म्हणाले, याचा पाया खरोखर उत्कृष्ट आहे.

स्वामी विवेकानंद यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. मित्राबरोबर भांडणतंटा न करता त्यांनी विषय टाळला. दोघांमध्ये हास्यविनोदास सुरूवात झाली.

अशा पद्धतीने स्वामी विवेकानंद यांनी हा प्रसंग हाताळला. त्यांचा आणि ख्रिश्चन मित्राचा एकच नागरी कायदा होता का? नक्कीच नाही.

त्याचे एकमेव कारण प्रगल्भ शिक्षण हेच होते. त्यांना माहित होते, की कोणत्याही नकारात्मक प्रसंगास विधायक वळण देता येते. मतभेद असले तरी आपण एक दिलाने राहू शकतो. स्वामीजींची विद्वत्ता हेच यामागील रहस्य

## मुस्लिमांना उपदेश

अखेरीस सुप्रिम कोर्टाने मागे दिलेल्या निवाड्यानंतर मुसलमानांनी जे केले त्याची पुनरावृत्ती त्यांनी करू नये. शाहबानो प्रकरणी सुप्रिम कोर्टाने निवाडा दिल्यानंतर देशभरातील मुसलमानांनी निषेध व्यक्त केला. मिरवणुका काढल्या. त्यामुळे देशातील हिंदुत्ववाद्यांचा फायदा झाला.

आता पुन्हा ते मुसलमानांना भडकवून त्यांनी रस्त्यावर यावे याची प्रतीक्षा करत आहेत. अशा प्रकारे मुसलमानांनी स्वतःस धोक्यात घालू नये.


हे स्पर्धेचे आणि आव्हानांचे जग आहे. प्रत्येकजण दुसऱ्याच्या कमकुवतपणाची संधी मिळावी या प्रतीक्षेत आहे. कुरआनमध्ये म्हटले आहे, की ज्या प्रमाणे तुमच्या पूर्वी होऊन गेलेल्या दृढनिश्चयी पैगंम्बरांनी सहन

केले त्याप्रमाणे तुम्ही सहन करा आणि त्यांच्या बाबतीत घाई करू नका.

सहनशीलतेमुळे तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याची संधी शत्रु पक्षास मिळत नाही. सहनशीलता नसेल तर, तुमच्या हातून चुका होतील आणि तुमचा बळी जाईल. कटकारस्थान तुमच्याभोवती रचले जात आहे त्यास बळी पडायचे की नाही हे तुमच्याच हातात आहे. कोणतीही व्यक्ती अथवा समूह ज्यांना लक्ष्य बनवण्यात येत आहे त्यांच्या यशाचे रहस्य यातच सामावले आहे.

# SPIRIT OF ISLAM

App Now Available at




**Download the app :**
http://goo.gl/cCGpQJ

# SPIRIT OF ISLAM

*(Montly Magazine)*


---


Towards Global Peace and Spiritual Living
**SMS for a complimentary copy :** 08050202626
**Email :** thecentreforpeace@gmail.com / **Web.:** www.cpsglobal.org


## Towards Spiritual Living


Al-Risala and Spirit of islam are two monthly spiritual magazines. They aim at helping indivuduals discover for themselves answers to their questions on spirituality, religion, this life and life beyond, and also instill in them the spirit of dawah work.













## Annual Subscription

Al-Risala : India - ₹ 200 Overseas - US $ 20

Spirit of Islam : India - ₹400 Overseas - US $30


**Al-Risala**
1, Nizamuddin West Market, New Delhi - 110013
Tel.: 011-41827083 / 46521511 / Mob.: +91-8588822679 / +91-8588822680

**Spirit of Islam**
002, HM Wimberly, 6, Barlie Street Cross, Langford Town, Bangalore - 560025
**Mob.:** +91-8050202626 / **Email :** subscription @thespiritofislam.org
**Web :** www.spiritofislam.co.in

---

ही पुस्तिका खालील पत्त्यावर मिळेल.

**अब्दुस समद खलिल अहेमद**
**१०५०, रविवार पेठ, पुणे - ४११००२**
**फोन नं. : 020 24472830 मोबा. नं.: 9665059035**



**Maulana Wahiduddin Khan**

Born in 1925, in Azamgarh, Uttar Pradesh, is an Islamic spiritual scholar who is well-versed in both classical islamic learning and modern disciplines. The mission of his life has been the establishment of worldwide peace. He has received the Padma Bhushan, the Demiurgus Peace International Award and Sayyidina Imam-Al-Hassan Peace Award for promoting peace in Muslim societies. He has been called 'Islam's spiritual ambassador to the world and is recognized as one of it's most influential Muslims. His books have been translated into sixteen languages and are part of university curricula in six countries. He is the founder of the Centre for peace and Spirituality based in New Delhi.

---

Towards Global Peace and Spiritual Living
**SMS for a complimentary copy :** 08050202626
**Email :** thecentreforpeace@gmail.com / **Web.:** www.cpsglobal.org